**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१**

दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६ Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in

महत्वाचे / तात्काळ कार्यवाही

जा.क्र.आस्था/क.आ.गट-क/ना.नि./२०२५-२०२६/प्रशा-१/३९८० दि. १६ जून, २०२५.

प्रति,

सहायक संचालक (जाहिरात),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासकीय भवन, १७ वा मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई-३२.

**विषय :** नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभागातील कनिष्ठ आरेखक, गट-क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याबाबत.

**संदर्भ :** १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रनिमं१२२४/प्र.क्र.७०/सेवा-४ (का. १३-अ), दि.१८.०७.२०२४.
२. शासन, नगर विकास विभागाकडील पत्र क्र.नियुक्ती ११२३/१८७१प्र.क्र.३९७/नवि-२७, दि.०८.१०.२०२४.

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयातील राज्यस्तरीय कनिष्ठ आरेखक, गट-क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. याबाबतची जाहिरात राज्यस्तरावर एकाच वेळी प्रसिध्द होणे आवश्यक आहे. तरी नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोंकण, नाशिक व पुणे या सहाही महसूल विभागांतर्गतच्या सर्व जिल्ह्यातून प्रकाशित होत असलेल्या सर्वाधिक खपाच्या मराठी, इंग्रजी व एका ऊर्दू दैनिक वृत्तपत्रात प्रकाशित करण्यासाठी जाहिरातीचा मसुदा सोबत तीन प्रतीत पुरविण्यात येत आहे. **सदरहु जाहिरात उक्त नमूद वृत्तपत्रांमध्ये दि.१७/०६/२०२५ रोजी प्रकाशित होणे आवश्यक आहे**. जाहिरातीचा आकार आणि फॉन्ट या बाबी सोबत जोडण्यात येत असलेल्या जाहिरातीपेक्षा भिन्न आणि जादा आकाराच्या नसाव्यात. दिलेल्या सूचनेनुसार जाहिरात प्रसिध्द न झाल्यास जाहिरातीसाठी जादा उपयोगात आणलेल्या भागाचे देयक संचालनालयाकडून अदा केले जाणार नाही, याचीसुध्दा संबंधित वृत्तपत्र कार्यालयास कृपया जाणीव करुन देणेत यावी.

कृपया जाहिरात कोणत्या दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली आहे, याबाबतची माहिती या कार्यालयास वृत्तपत्रांच्या ५ प्रतीसह पाठवावी.

सहपत्र - जाहिरात ३ प्रतीत.

( डॉ.प्रतिभा भदाणे )
मा.अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे
तथा, संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत :-** मा.अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि-२७), मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.



CamScanner

**प्रत** :- सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग / नाशिक विभाग / कोंकण विभाग / छत्रपती संभाजीनगर विभाग / अमरावती विभाग / नागपूर विभाग यांना माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

/- त्यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील जिल्ह्यांमधील दैनिक वृत्तपत्रामध्ये सदर जाहिरात प्रसिध्द होण्यासाठी पाठपुरावा करावा व प्रस्तुतची जाहिरात प्रसिध्द झालेल्या वृत्तपत्राच्या प्रती संचालनालयास सादर कराव्यात.



CamScanner

**<u>महाराष्ट्र शासन</u>**

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**

**संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

**मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१**

**वाचा :- महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागांतर्गत पुणे / कोकण / नागपूर / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती विभागातील कनिष्ठ आरेखक (गट-क) संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात, जाहिरात क्र.०२/२०२४ अन्वये वर्तमान पत्रामध्ये व नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर दि.१०.१०.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदरहू जाहिरात प्रसिध्द केल्यानुषंगाने, समांतर आरक्षणानुसार दि.१५.१०.२०२४ रोजी सुधारित शुध्दीपत्रक नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. आता यापूर्वी प्रसिध्द केलेली जाहिरात व शुध्दीपत्रक रद्द करण्यात येत असून, सुधारित जाहिरात पुढीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे,**

**जाहिरात क्रमांक - ०१ / २०२५**

महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागांतर्गत पुणे / कोकण / नागपूर / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती विभागातील कनिष्ठ आरेखक (गट-क) संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची सुविधा महाराष्ट्र शासनाच्या www.urban.maharashtra.gov.in व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि.१९.०६.२०२५ रोजी, १७.०० वाजल्या पासून उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच, सदरहू जाहिरात रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाच्या https://ese.mah.nic.in या संकेतस्थळांवर देखील प्रसिध्द करण्यात येत आहे.

| कनिष्ठ आरेखक (गट-क) वेतनस्तर- एस ०८, रु.२५५००-८११०० अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते (एकुण २८ पदे) | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा | अ.ज | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा.शै.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखीव (खुला) | एकुण पदे |
| पदसंख्या | ३ | २ | १ | १ | १ | १ | १ | ५ | ३ | ३ | ७ | २८ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | २ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | २ | २ | ३ | १६ |
| (२) महिला | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | २ | ८ |
| (३) खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (४) माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| (५) भूकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (६) प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (७) पदवीधर अंशकालीन | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | २ |
| (७) दिव्यांग | ०१ पद ( दिव्यांगांच्या कर्णबधीर अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता (D, HH) प्रवर्गासाठी आरक्षित ) | | | | | | | | | | | |
| (८) अनाथ | ------ | | | | | | | | | | | |

<u>टिप -</u>

१) सर्व प्रादेशिक विभागांकडून अनुकंपा, अतिरिक्त संवर्ग कक्षाकडून माहितीला अनुसरुन तसेच अन्य इतर कारणांना अनुसरुन, उपरोक्त प्रमाणे भरावयाच्या पदांच्या संवर्ग, सामाजिक / समांतर आरक्षणाच्या तसेच, पदसंख्या व राखीव / बिनराखीव पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

२) समांतर आरक्षणाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील अन्य पात्र उमेदवारांची निवड करुन पद भरतीची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

३) उपरोक्त रिक्त पदांपैकी ०१ पद हे शासन नियमानुसार दिव्यांग उमेदवारांसाठी आरक्षित असून सदर पद सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरले जाईल.

❖ सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.३४६८/२०२४ व इतर न्यायिक प्रकरणातील मा.न्यायालयाच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहुन प्रसिध्द करण्यात येत आहे. या जाहिरातीचे अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उमेदवारांच्या शिफारशी व नियुक्त्या उक्त उल्लेखित न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येतील.

❖ **वेळापत्रक**

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | दिनांक १९ जून, २०२५ रोजी १७.०० वाजल्यापासून दिनांक २० जुलै, २०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २१ जुलै, २०२५ रोजी २३. ५९ वाजेपर्यंत |
| २ | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | याबाबतच्या सूचना विभागाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. |
| ३ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | |

टिप –

१. कनिष्ठ आरेखक पदासाठी ऑनलाईन परीक्षा स्वतंत्रपणे, स्वतंत्र वेळापत्रकानुसार घेण्यात येतील. याबाबतच्या सूचना वेळोवेळी विभागाच्या **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. अशा सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी.

२. उमेदवारांच्या संख्येस अनुसरुन ऑनलाईन परीक्षा आवश्यकतेनुसार वेगवेगळया दिवशी वेगवेगळया सत्रांमध्ये घेण्यात येईल.

३. कनिष्ठ आरेखक या पदासाठीची परीक्षा २ स्तरांवर घेण्यात येणार असून प्रथमतः ऑनलाईन परीक्षेमध्ये किमान ४५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेल्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी परीक्षा स्वतंत्रपणे, स्वतंत्र वेळापत्रकानुसार घेण्यात येईल.

❖ **सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता -**

| अ.क्र. | पद | किमान शैक्षणिक व तांत्रिक अर्हता |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ आरेखक (गट-क) | **शैक्षणिक अर्हता –** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मान्यताप्राप्त शासकीय संस्थेतून दोन वर्षाचे स्थापत्य किंवा वास्तुशास्त्रीय आरेखक पाठ्यक्रम उत्तीर्ण प्रमाणपत्र; किंवा शासनाने वेळोवेळी घोषित केलेली इतर कोणतीही समतुल्य अर्हता धारण केलेली असावी. (समतूल्य शैक्षणिक अर्हता संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या सर्वसाधारण सूचनांमध्ये नमूद करण्यात आली आहे.)<br>**तांत्रिक अर्हता –** नामनिर्देशनाने उक्त पदावर नियुक्त करावयाच्या व्यक्तीने मान्यताप्राप्त संस्थेतून स्वयं-संगणक सहाय्यित आराखडा (ऑटो-कॅड) किंवा अवकाशीय नियोजन (Spatial Planning) यामध्ये भौगोलिक माहिती प्रणाली (जी.आय.एस.) परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>परंतू, उमेदवाराने राष्ट्रीय कौशल्य अर्हता संरचना (एनएसक्युएफ) याच्याशी संलग्न स्थापत्य किंवा वास्तुशास्त्रीय आरेखक पाठ्यक्रम उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र धारण केलेले असल्यास, त्याला मान्यताप्राप्त संस्थेतून स्वयं-संगणक सहाय्यित आराखडा (ऑटो-कॅड) किंवा अवकाशीय नियोजन (Spatial Planning) यामध्ये भौगोलिक माहिती प्रणाली (जी.आय.एस.) परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात येईल". |

**टिप - प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास उमेदवाराने संबंधित किमान शैक्षणिक व तांत्रिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.**

❖ **वयोमर्यादा :-**

१) उक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकास किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२) मागासवर्गीयांसाठी / खेळाडूंसाठी / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी / सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गासाठी / उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ०५ वर्षे शिथिलक्षम राहील. तसेच, दिव्यांग, भूकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील. पदवीधर अंशकालीन उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ५५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. शासन निर्णय क्र.मासैक-१०१०/ प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२०.०८.२०१० मधील तरतूदीनुसार माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत विहित वयोमर्यादेतील सूट ही त्यांचा सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

३) मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, अंशकालीन कर्मचारी आणि माजी सैनिक यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची कोणतीही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

❖ **परीक्षा शुल्क :-**

| अराखीव (खुला) प्रवर्ग - १०००/- | राखीव प्रवर्ग - ९००/- |
|---|---|
| उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.<br>माजी सैनिकांसाठी परीक्षाशुल्क आकारले जाणार नाही. | |

❖ प्रस्तुत जाहिरातीमध्ये पदभरती संदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पद्धत, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या इ. बाबतचा तपशिल **www.urban.maharashtra.gov.in**, **www.dtp.maharashtra.gov.in** व **https://ese.mah.nic.in** या संकेतस्थळांवरील "सर्वसाधारण सूचना" मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल.

❖ भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे **www.urban.maharashtra.gov.in**, **www.dtp.maharashtra.gov.in** व **https://ese.mah.nic.in** या संकेतस्थळांवर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. याबाबत उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

❖ स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

दिनांक : १७/०६/२०२५
ठिकाण : पुणे.

(विजयकुमार ल वाघमोडे)
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा,
उपसंचालक, नगर रचना,
मुख्य कार्यालय, पुणे.

(डॉ.प्रतिभा भदाणे)
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.



CamScanner